# महात्मा फुले नागरी सह.पतसंस्था मर्या.

चांदवड जि.नाशिक

सुरक्षितता, विश्वासार्हता, आणि तत्परता यांचा त्रिवेणी सुरेख संगम

## संचालक मंडळ

### संस्थापक :- श्री.प्रा.निकम टी.पी.

| | |
|---|---|
| श्री.डॉ.अरुण पुंडलिकराव निकम | चेअरमन |
| सौ.रेखा विलासराव महाजन | व्हा.चेअरमन |
| श्री.तुकाराम पुंडलिकराव निकम | संचालक |
| श्री.देविदास त्र्यंबकराव शेलार | संचालक |
| श्री.निवृत्ती दामोदर निकम | संचालक |
| श्री अरुण शंकरराव सोनवणे | संचालक |
| श्री.नंदकुमार पुंडलिकराव शेलार | संचालक |
| श्री.दत्तात्रेय काशिनाथ गांगुर्डे | संचालक |
| श्री.अशोक शामराव माळी | संचालक |
| श्री.दगाजी रामचंद्र बच्छाव | संचालक |
| श्री.रामदास सदाशिव साळवे | संचालक |
| श्री.उमरावसिंग रघुनाथसिंग परदेशी | संचालक |
| श्री.किशोर दशरथ शेलार | स्विकृत संचालक |
| सौ.कल्पना संजय गांगुर्डे | स्विकृत संचालक |

## कर्मचारी वृंद

| | |
|---|---|
| श्री.विलास पंडीतराव आहेर | मॅनेजर |
| श्री.गजेंद्र बाळू शेलार | लिपीक |
| श्री.सतिश मुरलीधर आहेर | वसुलीअधिकारी |
| श्री.राजेश सुभाष व्यवहारे | कॅशियर |
| श्री.सुशिल दिगंबर पंडीत | शिपाई |

## कायदेशीर सल्लागार

ॲड.श्री.शिवाजीराव महादु सोनवणे

## चार्टड अकौटन्ट

श्री.एस डी.ठाकरे

## वाहन व्हॅल्युअर

श्री.अभयकुमार आर.मेहता , मालेगाव

## ऋणातून समृध्दीकडे

# महात्मा फुले नागरी सह.पतसंस्था मर्या.

## १० वी वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

### फक्त सभासदांसाठीच

जा.क्र.वा.स.सन.२०११ दि.०९/०७/२०११

आपल्या संस्थेच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते की, आपल्या संस्थेची "वार्षिक सर्वसाधारण सभा" शनिवार दि.३०/०७/२०११ रोजी दुपारी २.००वा एन. डी.सी.सी.मार्केट यार्ड शाखा चांदवड.येथे आपल्या संस्थेचे **चेअरमन मा.श्री.डॉ.अरूण पुंडलिकराव निकम** यांचे अध्यक्षतेखाली खालील विषयांचा विचार करण्यासाठी बोलविण्यात येत आहे. तरी सर्व सभासदांनी सभेस वेळेवर उपस्थित रहावे ही नम्र विनंती!

## सभेपुढील विषय

१) मा.नियोजीत अध्यक्षांना अध्यक्षस्थान स्विकारणेस विनंती करणे.

२) मागील वार्षिक सर्वसाधारण सभेचे प्रोसिडींग वृत्त वाचून कायम करणे

३) सन २०१०-२०११ सालाचे नफा-तोटा पत्रक ,ताळेबंद व संचालक मंडळाचा अहवाल वाचुन कायम करणे.

४) सन २०१०-२०११ च्या संचालक मंडळाने सुचविलेल्या नफा वाटणीस मंजुरी देणे.

५) सन २०११-२०१२ च्या अंदाज पत्रकास मंजुरी देणे.

६) सन २०१०-२०११ च्या वर्षात अंदाज पत्रकापेक्षा जास्त झालेल्या खर्चाला मान्यता देणे.

७) सन २०१०-२०११ वर्षाचे ऑडीट मेमोचे वाचन करून दोष दुरूस्तीस मंजुरी देणे.

८) मा.अध्यक्ष साहेब यांचे पूर्व परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयांचा विचार करणे.

### आपले नम्र

| श्री.विलास आहेर | सौ.रेखा महाजन | श्री.डॉ.अरूण निकम |
|---|---|---|
| मॅनेजर | व्हा.चेअरमन | चेअरमन |

### मा.संचालक मंडळ

## सुचना

१) ज्या सभासदांना माहिती हवी असेल अगर काही सुचना करावयाच्या असतील त्यांनी दि.२३/०७/२०११ पर्यंत लेखी कळवावे.

२) कोरम अभावी सभा तहकुब झाल्यास त्याच ठिकाणी अर्ध्यातासानंतर कोरम असो वा नसो सभेचे कामकाज पुर्ण करण्यात येईल.

# महात्मा फुले नागरी सह. पतसंस्था मर्या.

## चांदवड जि. नाशिक

## सन २०१० - २०११ चा वार्षिक अहवाल

सस्नेह नमस्कार ......
सर्व सन्माननीय सभासद बंधू - भगिनींनो ,

आज १०व्या वार्षिक सर्वसाधारण सभेसाठी आलेल्या सर्व सन्माननीय सभासदांचे महात्मा फुले नागरी सहकारी पतसंस्थेच्या वतीने सर्वांचे मनःपुर्वक स्वागत करतो. दि. ३१/०३/२०११ अखेर संपलेल्या आर्थिक वर्षाच्या प्रगतीचा आलेख मांडण्यासाठी मी आपल्या समोर उभा आहे. नुकत्याच संपलेल्या आर्थिक वर्षातील नफा-तोटा पत्रक ,ताळेबंद संचालक मंडळाच्या वतीने सादर करतांना मला विशेष आनंद होत आहे.

चांदवड तालुक्यातील सर्व सभासदांनी आमच्यावर विश्वास दाखवून जे मोलाचेसहकार्य केले. ठेवीदारांच्या व सभासदांच्या विश्वासाला तडा जाणार नाही याची कटाक्षाने काळजी घेवुन संस्थने कठीण निकष लावुन कर्जवाटप, कर्जवसुली व दैनंदिन काम केले आहे. त्याचीच फलनिष्पत्ती म्हणुन संस्थेला सलग ५ वर्षे "अ तारांकीत" ऑडीट वर्ग मिळालेला आहे. तर १०वर्षाच्या अल्पकालावधीत संस्था स्वतःच्या मालकीच्या अद्ययावत भव्य नुतन वातानुकूलीत वास्तुत संगणकी- -करणासह सुसज्ज अवस्थेत आज आपण पाहात आहोत.

सन २००१ रोजी समाजाने लावलेले हे इवलेसे रोपटे अवघ्या १० वर्षा त्याचे वटवृक्षात रूपांतर झाल्याचा चमत्कार आपण पहात आहोत. म्हणून चांदवड तालुक्यातील एक अग्रगण्य संस्था म्हणून महात्मा फुले नागरी सह. पतसंस्थेला ओळखले जाते. सुरूवातीपासून संस्थेच्या सर्व व्यवहारात नियोजन बध्दता, पारदर्शकता, तत्परता, विश्वासार्हता व आर्थिक शिस्ती बरोबर कार्यालयीन शिस्त राखण्याचे काम संचालक मंडळाने केलेले आहे. ते केवळ आपल्या बहुमोल सहकार्यामुळे शक्य झालेले आहे. म्हणून संस्थेच्या नेत्रदिपक प्रगतीत व नाव लौकीकात आपला मोलाचा वाटा आहे. चांदवड तालुक्यातील अनेक नामांकित पतसंस्था व बँका आहे. त्यांच्याशी निर्मळस्पर्धा करून, दुष्काळ, आर्थिक मंदी व महाराष्ट्र सहकार खात्यांनी लादलेले निर्बंध या सर्वांना सक्षमपणे सामोरी जावून संस्थेने गरजु व होतकरू तरूणांना, व्यावसायिकांना कर्जवाटप केले आहे. सभासदांनी देखील आर्थिक शिस्तीचे दर्शन घडविल्यामुळे आम्ही ~~[illegible]~~ २८.१३% कर्ज वसुली करू शकलो ही खरोखरच कौतुकाची गोष्ट आहे.

दरवर्षी वाढता नफा,वाढते कर्ज वाटप ,वाढत्या ठेवी ही संस्थेच्या दृष्टीने भूषणावह गोष्ट आहे. मला सांगण्यास अत्यंत आनंद होत आहे की, संस्थेने दि. ३१/०३/२००६ रोजी ८,५८,३७५=०० रूपयाची वास्तु खरेदी केली होती, स्पर्धेच्या युगात व आवश्यकतेची निकड लक्षात घेवून संस्थेने संपूर्ण कार्यालयीन कामकाजासाठी संगणकिकरण प्रणाली सुरू केलेली आहे. संस्था वातानुकूलीत करण्यासाठी ३ ए. सी. बसविण्यात आले आहे. आज "महात्मा फुले नागरी

महात्मा फुले नागरी सह.पतसंस्था मर्या. ता.चांदवड जि.नाशिक

सह.पतसंस्था" ही अंतर - बाह्य सुंदर व सक्षम असलेली तालुक्यातील एकमेव संस्था आहे. या श्रेयाचे मानकरी संचालक मंडळ असले तरी खरे श्रेयाचे मानकरी हे सन्माननीय सभासद आहे. त्यांच्याच सहकार्यामुळे संस्थापक प्रा. निकम टी. पी. यांच्या स्वप्नांना मुर्त रूप आले आहे. संस्थेच्या आजपर्यंतच्या या प्रगतीचे, संस्थेला नावारूपाला आणून उत्तुंग शिखरावर पोहचविण्याचे खरे शिल्पकार संस्थापक प्रा. निकम टी. पी. हे आहे.

संस्थेच्या प्रगतीचे आणखी एक पाऊल पुढे पडावे यासाठी मी आपणासमोर संस्थेच्या हिताची भावी योजना मांडणे पसंद करेल. संस्थेला एका सभागृहाची नितांत गरज आहे. आपण सर्वांनी ठरवले तर काम कठीण असले तरी अशक्य नाही असे मला वाटते. दोन वर्षापासून टॅक्स ऑडीटच्या कठीण परीक्षेतून जावून देखील आपल्या प्रगतीचा आलेख वेगाने उंचावत आहे. संस्थेने उपविधित दुरूस्ती करून कार्यक्षेत्रात वाढ करून चांदवड कार्य-क्षेत्र केले आहे. तसेच कर्जवाटपाची मर्यादा आता १०,००,०००=००रूपयांपर्यंत केली आहे. अजूनही बरेच काही करावयाचे आहे. विविध योजना आहे. त्यासाठी आपले सर्वांचे सहकार्य राहील अशी आशा बाळगतो. संस्था याच वेगाने विकासाच्या दिशेने उंच भरारी घेईल अशी मी संचालकांच्या वतीने ग्वाही देतो. पुनःश्च एकदा आपले मनःपुर्वक हार्दिक स्वागत करून आपल्या शुभेच्छा ह्रदयाशी बाळगून १०वा वार्षिक अहवाल आपणापुढे सविनय सादर करीत आहे.

## भागभांडवल :-

संस्थेचे अधिकृत भागभांडवल २५,००,०००=००रूपये असून दि. ३१/०३/२०११ अखेर संस्थेचे एकुण सभासद संख्या २७८ असून वसूल भागभांडवल १३६०३००=०० रूपये आहे .अहवाल सालात भाग भांडवल रूपये १७१७००=०० ने वाढ झालेली आहे.

## राखीव व इतर निधी :-

संस्थेच्या आर्थिक परिस्थितीची व स्थैर्याची कल्पना तिच्या एकूण स्वनिधी वरून लक्षात येते. कारण राखीव व इतर निधी हाच संस्थेचा आत्मा आहे. दि. ३१/०३/२०११ अखेर संस्थेचा निधी रूपये ४४३८०३५.१० असून अहवाल वर्षात निधीमध्ये रूपये ४,४५,२४३=०० ने वाढ झालेली आहे.

## ठेवी :-

संस्थेचे उत्कृष्ट कामकाज व संस्थेवर दृढ विश्वास यामुळे अनेक हितचिंतक व स्नेही बांधवांनी उत्स्फुर्तपणे ठेवी ठेवल्यामुळे ठेवीमध्ये प्रतिवर्षी प्रचंड वेगाने वाढ होत आहे. ही संस्थेच्या दृष्टीने कौतुकाची गोष्ट आहे. ठेवीत होणारी वाढ ही सभासद व परिवाराच्या विश्वासाचे प्रतिक आहे. अहवाल वर्षात ठेवीमध्ये रूपये २०३०३७७=०० घट झालेली असून या वर्षाअखेर संस्थेच्या ठेवी रूपये ३०५३९६६०=०० इतक्या आहे. सदर ठेवी अत्यंत सुरक्षीत आहे असे मी चेअरमन या नात्याने आपणांस सांगू इच्छितो.

**कर्ज वाटप :-**

संस्थेने व्यापारी, शेतकरी, शेतमजूर, कामगार मजूर इत्यादी सर्व गरजू व्होतकरू लोकांना 'अ' वर्ग व 'ब' वर्गातून कर्ज वाटप केलेले आहे. कर्ज वाटप करतांना कर्जदारावर अवलंबून असलेल्या व्यक्ती, परत फेडीची क्षमता, त्याची विश्वासार्हता व गुणात्मक कसोटीच्या आधारे रूपये २१३९३७६६=00 इतके कर्ज वाटप केलेल आहे. गतवर्षाच्या तुलनेत कर्ज वाटपात रूपये ५०३०९९५=00 ने वाढ झालेली आहे.

**थकबाकी :-**

थकबाकी वसूल करणे हे पतसंस्थांच्या कामकाजातील सर्वात कठीण काम आहे. परंतु वसुली हा संस्थांचा आत्मा असून त्यावर संस्थेचे अस्तित्व व विकास अवलंबून असतो. परंतु कार्यालयीन कर्मचाऱ्यांनी केलेले प्रयत्न व सभासदांनी दिलेली मोलाची साथ यामुळे दि. ३१/०३/२०११ अखेर संस्थेने ९७.३% इतकी कौतुकास्पद कर्जवसुली केली आहे. कोणत्याही सभासदावर आपण कठोर कारवायी केलेली नाही. यावर्षी १00%कर्जवसूली करून निरंक थकबाकी करण्याचा मानस आमचा आहे. त्यासाठी सर्व सभासदांनी सहकार्य करावे अशी मी विनंती करतो. मागील दोन वर्षापासून एन.पी.ए. लागू झालेला नाही. एन.पी.ए.ची तरतुद पूर्णपणे केलेली असून संस्थेचे एन.पी.ए.चे प्रमाण ६.५४% इतके आहे.

**गुंतवणूक :-**

सहकार खात्याने पतसंस्थेला घालून दिलेल्या सी.डी. रेशोचे आपल्या पतसंस्थेने पूर्णपणे पालन केलेले आहे. संस्थेने नियोजनपूर्वक पध्दतीने रूपये १२४६२२८९=00 रूपयांची गुंतवणूक केलेली आहे.

**संचालक मंडळ सभा :-**

अहवाल वर्षात संचालक मंडळाच्या १२ सभा झालेल्या असुन संचालकांनी स्वतःची कामे बाजुला ठेवुन संस्थेच्या विकासासाठी कमाल वेळ दिलेला आहे म्हणुन संचालक मंडळ अभिनंदनास पात्र आहे. यापुढेही असेच सहकार्य मिळेल अशी मी अपेक्षा बाळगतो .

**नफा:-**

गुणात्मक कर्ज वाटप व कमाल कर्जवसुल, खर्चात काटकसर, कुशल व्यवस्थापन व कौशल्यपूर्ण गुंतवणूक या सर्वांच्या एकत्रित प्रयत्नामुळे या वर्षात संस्थेला५,६0,000=00 रूपयांचा निव्वळ नफा झालेला आहे .सदरच्या

नफ्यातुन उपविधीच्या अधिन राहुन नियमाप्रमाणे सर्व तरतुदी करण्यात आलेल्या आहे प्रतिवर्षीवाढता नफा संस्थेच्या दृष्टीने गौरवास्पद गोष्ट आहे .

## कर्मचारी परिवार :-

आपल्या संस्थेस अतिशय कार्यक्षम ,प्रामाणिक व समर्पित भावनेने प्रेरित असे ५कर्मचारी वर्ग लाभलेले आहे . संस्थेच्या यशात त्यांचा सिंहाचा वाटा आहे. संस्थेच्या विकासावरच कर्मचाऱ्यांचे भवितव्य अवलंबून असते. म्हणून संस्थेतील कर्मचारी परिवाराने ध्येयाने प्रेरित होवून निष्ठेने व प्रामाणिकपणे काम करावे कारण आपणांस विकासाचा अजून खराच मोठा टप्पा गाठावयाचा आहे.

## लेखा परिक्षण :-

संस्थेच्या लेखा परिक्षणावरून संस्थेचे खरे चित्र समजते संस्थेला गेली ६वर्षांपासुन सतत "अ स्टार" ऑडीट वर्ग मिळत होता परंतु मागील काही वर्षात कामकाजातील किरकोळ त्रुटींमुळे गुण कमी मिळाले त्यामुळे संस्थेला तिस-यांदा 'अ' ऑडीट वर्गावर समाधान मानावे लागले.

## आभार :-

आपल्या पतसंस्थेच्या प्रगतीत सर्व सभासद, ठेवीदार,कर्जदार, हितचिंतक यांचा सिंहाचा वाटा आहे. त्यांचे मन:पूर्वक आभार मानतो. मा. सहाय्यक निबंधक श्री. महेश भडांगे साहेब,सहकार व बँकिंग क्षेत्रातील सर्व अधिकारी,श्री. शिवाजीराव सोनवणे (कायदेशिर सल्लागार), श्री. ठाकरे एस डी (सी. ए. ), संस्थेचे वाहन व्हॅल्युअर श्री. अभयकुमार मेहता (मालेगांव), सहकार , राजकीय , शैक्षणिक आदी विविध क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी आपला बहुमुल्य वेळ देवून संस्थेला वेळोवेळी मार्गदर्शन केले,भेटी देवून सुचना केल्या त्यांचेही मन:पूर्वक आभार मानतो.

॥ जय हिंद...! ॥

आपला स्नेहांकित,

(श्री. डॉ. अरूण निकम)
चेअरमन

## महात्मा फुले नागरी सह. पतसंस्था मर्या. चांदवड

## ताळेबंद पत्रक दिनांक ३१/०३/२०११ अखेर

| मा. वर्षी | देणी | | मा. वर्षी | मालमत्ता | |
|---|---|---|---|---|---|
| | इतर येणे | | ११६००५.०० | रोख शिल्लक | ५४९२०.० |
| .०० | बॅंक कलेक्शन खाते | १६०००.०० | | बॅंक | |
| | भागभांडवल | | ६४६५८५.०० | एन डी सी सी बॅंक चालू (करंट) | १९२२२७.० |
| १९८८६००.०० | सभासद भागभांडवल | १३६०३००.०० | २१६१८९.०० | एन डी सी सी बॅंक सेव्हींग खाते | ५७५४०.० |
| | ठेवी | | २२७९४.०० | नामको बॅंक चालू खाते (शाखा चांदवड) | ३८६६१.० |
| ४३६१४०.०० | मुदत ठेव खाते | २५७३००१४.०० | १३६००७.०० | बॅंक चालू खाते (स्टेट बॅंक) | ३०६८६.० |
| १०२२१०.०० | अल्पबचत ठेव खाते | ५७३७०.०० | ९८४५९१.०० | दि चांदवड मर्चन्टस बॅंक चालू खाते | १०७७५११.० |
| १०१७६३१.०० | बचत ठेव खाते | २५१३४४२.०० | २९०६८२.०० | ॲक्सिस बॅंक शाखा लासलगांव | ७३५८.० |
| ३२८६८९.०० | दामदुप्पट ठेव | ३३९६८९.०० | | गुंतवणूक | |
| २०६७७.०० | सुरक्षा ठेव खाते | ५९६.०० | १०३३१०००.०० | एन डी सी सी बॅंक मुदत ठेव खाते | २००००००.० |
| १९२४४०.०० | ज्येष्ठ नागरिक सुविधा | १८९८५४९.०० | १५०१०००.०० | नामको बॅंक मुदत ठेव (चांदवडशाखा) | ४५०७९३२.० |
| ६६२२५०.०० | जेष्ठ नागरिक सुविधा | ०.०० | ३६९१९९४.०० | स्टेट बॅंक (शाखा चांदवड) मुदत ठेव | ३६९१९९४.० |
| | निधी | | २०३५०.०० | लॉकर डिपॉझिट | २०३५०.० |
| ६३७६७१.०० | राखीव निधी | ७२६५५०.०० | ६३३४९१.०० | रिझर्व्ह फंड एन डी सी सी बॅंक | ७३३४९१.० |
| ८१६८७६.०० | इमारत निधी | २१९०४७४.०० | ५८८३.०० | बॅंक इमारत फंड | ५९७२.० |
| २७३०५.०० | सभासद लाभांश समिकरन | ४०३८८.०० | ५००.०० | नाशिक जि पत फेडरेशन शेअर्स | ५००.० |
| १२९५३६.०० | सभासद कल्याण निधी | १६८२१८.०० | १०००.०० | महा. राज्य पतसंस्था फेडरेशन शेअर्स | १०००.० |
| १००८९७.०० | विमा निधी | १६११४०.०० | १०५०.०० | नाशिक जि मध्य. सह बॅंक लि नाशिक इं | १०५०.० |
| ३५०१६६.०० | झिज फंड | ३५०१६६.०० | १५०००००.०० | स्टेट बॅंक मुदत ठेव शाखा वडाळीभोई | १५०००००.० |
| १०४९९७.०० | संशयीत व बुडित कर्ज निधी | ११०९१०.०० | | कर्ज | |
| ५४०.०० | बोर्ड व स्टाप ट्रेनिंग फंड | ४४८४०.०० | २१०६८०२.०० | वैयक्तीक कर्ज | २४८७५०१.० |
| ४६९१२५.०० | फर्निचर निधी | ४६९१२५.०० | ३६०९८३४.०० | हायरपर्चेस कर्ज | ४७६४३९६.० |
| ३९४००.०० | कर्मचारी भविष्य निर्वाह निधी | ९००.०० | ६२२६१२०.०० | मॉरगेज कर्ज | ५२३०५१३.० |
| १५१३००.०० | कॉम्प्युटर निधी | १०९४२५.०० | ५२५४६९.०० | नजरगहाण कर्ज | १४३०५०२.० |
| ६५९००.०० | इनव्हर्टर निधी | ६५९००.०० | २२५८४१६.०० | सोने चांदी तारण कर्ज | ३४५७७५२.० |
| ६२०८०.०० | ए.सी. निधी | ०.०० | ६५१०००.०० | मुदत ठेव ॲडव्हान्स | ४६४३००.० |
| | देणी व तरतुद | | ९८५१३०.०० | गृहतारण कर्ज | ७३९७०२.० |
| ३००००.०० | ऑडिट फी देणे | २९९१२.०० | .०० | टर्म लोन | २८१९१००.० |
| ५०००.०० | शिक्षण निधी देणे | ५०००.०० | | इतर येणे | |
| .०० | व्याज देणे | ४५६९.०० | २०००.०० | टेलिफोन अनामत खाते | २०००.० |
| ५०००.०० | आयकर तरतुद | ५०००.०० | ८०००.०० | डि टी पी एल सेवा केंद्र डिपॉ | ८०००.० |
| ३००००.०० | एन पी ए तरतुद | ३००००.०० | ३४३९७.०० | डिगीटच टेलिमॅक्स प्रा.लि.पुणे | ६२६१.० |
| २००००.०० | सेवक सानुग्रह अनुदान | २३५००.०० | | कायम मालमत्ता | |
| १३८५.०० | अनामत खाते | १३८५.०० | ८५८३७५.०० | कायम मालमत्ता खाते | ८५८३७५.० |
| | | | | डेडस्टॉक | |

## महात्मा फुले नागरी सह. पतसंस्था मर्या. चांदवड

### ताळेबंद पत्रक दिनांक ३१/०३/२०११ अखेर

| मा. वर्षी | देणी | | मा. वर्षी | मालमत्ता | |
|---|---|---|---|---|---|
| | | | ८०९५१६.०० | डेडस्टॉक खाते | ८२१७१६.0 |
| | | | | लायब्ररी | |
| | | | १५९३.०० | लायब्ररी खाते | २०४३.0 |
| ३३२९५९.०० | एकूण नफा | ५६००००.०० | | | |
| ३८१७५७७४.०० | | ३७०१३३६२.०० | ३८१७५७७३.०० | | ३७०१३३६१.0 |

# महात्मा फुले नागरी सह. पतसंस्था मर्या. चांदवड

## नफा तोटा पत्रक दिनांक ३१/०३/२०११ अखेर

| मा. वर्षी | खर्च | | मा. वर्षी | उत्पन्न | |
|---|---|---|---|---|---|
| | <u>बँक चार्जेस</u> | | | <u>इतर उत्पन्न</u> | |
| .00 | बँक चार्जेस | ७०१.00 | ७५00.00 | नोटीस खर्च जमा | २५२८.0 |
| | <u>इतर खर्च</u> | | २३९.00 | अल्पबचत कमिशन खाते (उत्पन्न) | ३९२.0 |
| ५३५२८.00 | वार्षिक सर्वसाधारण सभा खर्च | १४६२१.00 | | <u>व्याज उत्पन्न खाते</u> | |
| १३६२.00 | ग्रामपंचायत कर | 0.00 | .00 | दंड व्याज खाते | ६१५.0 |
| २९८३८.00 | अल्पबचत कमिशन खाते (खर्च) | २१३२१.00 | ३३५७.00 | अल्पबचत अॅडव्हान्स व्याज जमा (उत्पन्न | 0.0 |
| ५000.00 | शिक्षण निधी खर्च | ५000.00 | २0३३७२.00 | गृह्तारण कर्जावरील व्याज जमा (उत्पन्न) | १३३५६२.0 |
| ३0४४८.00 | ऑडिट फि खर्च | २५000.00 | .00 | टर्म लोनवरिल व्याज | १२७00२.0 |
| ९३३१.00 | पोस्टेज व टेलिफोन खर्च | १३६९५.00 | ३८५७४४.00 | वैयक्तीक कर्जावरील व्याज जमा (उत्पन्न | ४0२१४९.0 |
| .00 | सामाजिक कार्यक्रम खर्च | २३00.00 | ७0७0२३.00 | हायरपर्चेस कर्जावरील व्याज जमा (उत्पन्न | ८0४0९0.0 |
| ५६२५0.00 | प्रिंटिंग व स्टेशनरी | १७३0५.00 | ७६२४0१.00 | मॉरगेज कर्जावरील व्याज जमा (उत्पन्न) | १0३0९५९.0 |
| ५७0१७.00 | किरकोळ खर्च | ३४१८0.00 | १२३0३0.00 | नजरगहाण कर्जावरील व्याज जमा (उत्पन्न | ९५0७१.0 |
| ३000.00 | लॉकर भाडे | ४000.00 | २६६५५३.00 | सोनेचांदी कर्जावरील व्याज जमा (उत्पन्न) | ५२0६५१.0 |
| १४९0७.00 | लाईट बिल खर्च | २0७00.00 | ७१४५६.00 | मुदत ठेव अडव्हान्स व्याज जमा (उत्पन्न) | १२0३१५.0 |
| .00 | ए सी खर्च खाते | ५९२0.00 | | <u>गुंतवणुकिवरील व्याज</u> | |
| ३0२३0.00 | दुरूस्ती व देखभाल खर्च खाते | ३७८२७.00 | ७६८२0९.00 | गुंतवणुकिवरील व्याज खाते | ९८१७८५.0 |
| ११00.00 | प्रवास खर्च | २00.00 | | <u>अल्पबचत स्टेशनरी</u> | |
| ५४५0.00 | वकिल फी खर्च खाते | २२00.00 | १0.00 | अल्पबचत स्टेशनरी जमा | १0.0 |
| १९७00.00 | भविष्य निर्वाह निधी | २४५00.00 | | <u>डि. डि. कमिशन</u> | |
| ३५३00.00 | जाहिरात खर्च खाते | १६000.00 | ७२२२.00 | डि. डि. कमिशन | १२६७८.0 |
| ५00.00 | व्यवसाय कर खर्च | ५00.00 | | <u>प्रवेश फि</u> | |
| १७४0७.00 | मानधन खाते | ६0५00.00 | ११0.00 | प्रवेश फी | ८0.0 |
| | <u>व्याज खर्च खाते</u> | | | <u>बँक चार्जेस</u> | |
| १६११६.00 | अल्पबचत ठेवीवरील व्याज खर्च | ९0४७.00 | ११.00 | बँक चार्जेस | 0.0 |
| २२६0९६९.00 | मुदत ठेवीवरील व्याज खर्च | ३१२७१0९.00 | | <u>इतर खर्च</u> | |
| ३३८६४.00 | जेष्ठ नागरिक ठेवीवरिल व्याज | १0३८१.00 | ६५१९२.00 | विमा खर्च | 0.0 |
| १४६४५३.00 | बचत ठेवीवरील व्याज खर्च | ७८१८0.00 | | <u>सशस्त्र सेना ध्वजदिन २00७ निधी</u> | |
| | <u>पगार खाते</u> | | १00.00 | सशस्त्र सेना ध्वजनिधी २00७ निधी | ३00.0 |
| २१0८00.00 | पगार खाते | २११000.00 | | | |
| ३३२९५९.00 | ताळेबंद कडे एकूण नफा | ५६0000.00 | | | |
| ३३७१५२९.00 | | ४३0२१८७.00 | ३३७१५२९.00 | | ४३0२१८७.0 |

महात्मा फुले नागरी सह. पतसंस्था मर्या. चांदवड जि. नाशिक — रजि. नं. ... दि. ... चांदवड